<u>सी.एन.आर.क्र. एम.एच.पी.यु.१८–०००८६२–२०१५</u>
<u>स. फौ. ख. क्र. २२९/२०१५</u>
<u>निशाणी क्र. ३८</u>

**<u>फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र. १</u> :**
कारणे सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,
नांव :– निर्मला रविंद्र शिंदे, वय :– ३४ वर्षे,
धंदा :– शिलाई काम, राहणार :–दापोडी, ता. दौंड, जि. पुणे.

**<u>सरतपास फिर्यादीतर्फे वकील श्री. एच. डी. भोईटे यांच्यामार्फत सुरु</u> :–**

०१. दिनांक २७/०४/२०१५ रोजी आमचे घराच्या दरवाजाच्या समोर रस्त्यावर आरोपी क्र. १ ते ६ यांनी अतिक्रमण करुन भिंत बांधायला सुरुवात केली. त्यावेळेस संध्याकाळचे ६.०० ते ६.१५ वाजले. त्या दिवशी भांडण, हाणामा–या झाले होते. त्यावेळेस मी आरोपी क्र. १ ते ६ यांना 'आमचे येण्याजाण्याचा दारातील रस्ता व तेथे बांधकाम करु नका'. घटनेच्या आदल्या दिवशी आरोपींनी दाराच्या समोर काट्या टाकल्या होत्या. काट्या टाकल्या तेव्हा आरोपींनी मला शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर मी पोलीस स्टेशन यवत तक्रार दिली होती. जेव्हा घटने दिवशी आरोपींनी भिंत बांधली तेव्हा मी त्यांना पोलीस स्टेशन यवत तुमचे विरुध्द तक्रार केली असे सांगितले होते व आता पुन्हा तक्रार करणार आहे असे सांगितले. त्यावर आरोपी चिडले व मला मारणेकरिता अंगावर धाऊन आले, त्यावेळेस आरोपी मला म्हणाले की, 'तु आमचे विरुध्द तक्रार का केलीस, जागा तुझ्या बापाची आहे का'. आरोपी क्र. १ व २ यांनी मला माझे डोक्याचे केस धरुन जमिनवर आपटले आणि लाथाबुक्क्यांनी मारण्यास सुरुवात केली. तसेच मला पाठीवर, कमरेवर, डोक्यावर, हातावर, पायावर, पोटावर लाथाबुक्क्यांनी मारण्यास सुरुवात केली. त्यानंतर आरोपी क्र. ३ ते ६ यांनी देखील मला मारण्यास सुरवात केली. आरोपी क्र. ३ ते ६ यांनी मला टिकाव, खोरे याचे असणा–या लाकडी दांडक्याने मारण्यास सुरुवात केली. आरोपी क्र. ३ ते ६ यांनी वर नमुद लाकडी दांडक्याने डोक्यात, हातावर, कमरेवर मारले, त्यानंतर मी आरडाओरडा केला. त्यावेळेस माझे शेजा–यांनी मला वाचविले. त्यानंतर माझे आई वडिल आणि भाऊ त्या ठिकाणी आले त्यांना देखील आरोपींनी शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. आरोपींनी मला पोलीस स्टेशनला तक्रार केल्यास हातपाय तोडण्याची व जिवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर मी, आई वडिल व भाऊ पोलीस स्टेशन यवत येथे गेलो. पोलिसांनी माझी तक्रार घेतली व मला औषधोपचाराकरिता सरकारी दवाखान्यात पाठविले. सरकारी दवाखान्यात मी औषधोपचार घेतले.

०२. दिनांक २७/०४/२०१५ रोजीची पोलीस स्टेशन यवत येथे देण्यात आलेली तक्रार मला दाखविण्यात ती तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास <u>नि.६२</u> देण्यात येते. दिनांक २७/०४/२०१५ रोजीचे वैद्यकीय प्रमाणपत्र मला दाखविण्यात आले की जे मला स्वतःला वैद्यकीय अधिका–यांनी दिले होते. त्यावरील निशाणी अंगठा हा माझा आहे. तो मी ओळखते– त्यास <u>नि.६३</u> देण्यात येते. मला इंग्रजी वाचता येत नाही. पोलिसांनी माझी तक्रार घेतली मात्र कोणतीही कार्यवाही केली नाही व त्यानी मला न्यायालयात जाण्यास सांगितले. आरोपी हे मला गावात राहु नका, गाव सोडुन जा अशी नेहमी धमकी देतात.

**उलटतपास आरोपींतर्फे वकील श्री. पी. डी. खंडागळे यांच्यामार्फत सुरु :–**

०३. मध्यांतरामुळे उलटतपास दुपारपर्यंत तहकुब.

**उलटतपास मध्यांतरानंतर पुन्हा शपथेवर सुरुः**

०४. घटना घडल्यानंतर मी, माझे वडिल व भाऊ एका गाडीवरुन पोलीस स्टेशन गेलो होतो. आम्ही पोलीस स्टेशन सायंकाळी ७.०० ते ७.३० च्या दरम्यान पोहोचलो. घटनास्थळ ते पोलीस स्टेशनला जाण्यास साधारण एक तास कालावधी वाहनाने जाण्यासाठी लागतो. पोलिसांनी माझ्या तक्रारीवरुन कोणतीही कार्यवाही केली नाही म्हणुन मी डि.वाय.एस.पी. अथवा एस.पी. यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने कोणतीही तक्रार पाठविली नाही. हे खरे नाही की, घटना ठिकाणी कोणताही प्रकार घडलेला नव्हता, त्यामुळे पोलिसांनी माझ्या तक्रारीवर कोणतीही कार्यवाही केली नव्हती.

०५. मी माझ्या आई वडिलांकडे सन २००३ पासुन राहत आहे. हे खरे आहे की, आरोपी हे अनेक वर्षापासुन दापोडी या गावामध्ये राहत आहेत व तेव्हापासुन आरोपींचे त्या ठिकाणी घर आहे. हे खरे आहे की, गेले ४० वर्षापासुन आरोपी हे त्यांचे दापोडी येथील घरामध्ये राहतात. हे खरे आहे की, ज्या जागेवरुन वाद झाला ती जागा माझ्या मालकीची नाही. हे मला आठवत नाही की, ज्या जागेबद्दल वाद झाला त्या जागेबद्दलचा उतारा कामात दाखल केलेला आहे की नाही. ज्या जागेवर अतिक्रमण केले असे माझे म्हणणे त्या जागेचे मी फोटो काढले आहेत व त्याचे निगेटिव्हज पावतीसह कामात दाखल करणेस तयार आहे. सदरील फोटो मोबाईलवर काढले होते व ते माझ्या भावाने काढले होते. सदरील फोटो मी दाखल करण्यास तयार आहे. अतिक्रमण केलेल्या जागेबाबत मी अथवा माझ्या भावाने कोणताही दिवाणी दावा दाखल केलेला नाही. तसेच निश्चित अतिक्रमण किती आहे याबबात मी किंवा माझ्या वडिलांनी कोणतीही मोजणी करुन घेतलेली नाही. मी किंवा माझ्या वडिलांनी कोणतीही अतिक्रमण करु नये म्हणुन दापोडी ग्रामपंचायतचे ग्रामसेवकाने मला नोटीस काढली नव्हती. माझ्या वडिलांना नोटीस काढली होती की कसे हे माझे वडिल सांगु शकतात. मला मी पोलीस स्टेशनला गेली असता पोलिसांनी मला दवाखान्यात जाणेबाबत चिठ्ठी दिली होती. मी दवाखान्यात किती वाजता पोहोचले त्याची निश्चित वेळ सांगु शकत नाही. हे खरे आहे की, माझे वैद्यकीय प्रमाणपत्रामध्ये इंग्लिशमध्ये डॉक्टरांनी काय नमुद केले आहे ते माहिती नाही. साक्षीदार सांगते की, डॉक्टरांनी मला झालेल्या इजाबाबत समजावुन सांगितलेले होते. भांडण झाले तेव्हा घटना ठिकाणी माझे वडिल, भाऊ, आई, माझे चुलते आणि शेजारीचे बबनभाऊ खोडवे, मोहन शंकर गुळमे, शिवाजी विनायक मोटे इ. जमा झाले होते. घटना ठिकाणी ब–याच लोकांची वस्ती आहे.

०६. साक्षीदार क्र. ३ सुभाष खोडवे माझे वडिल, साक्षीदार क्र. ४ चतुराबाई ही माझी आई, साक्षीदार क्र. ५ खंडु हा माझा भाऊ व साक्षीदार क्र. ६ बबन हे माझे चुलते आहेत. साक्षीदार क्र. ७ व ८ हे माझ्या ओळखीचे आहेत. साक्षीदार क्र. ७ व ८ हे घटनास्थळापासुन ४ ते ५ किमी. अंतरावर राहतात. मी फिर्यादमध्ये दिले साक्षीदार यादीव्यतिरिक्त इतर दुसरा कोणतेही साक्षीदार तपासणार नाही.

प्रश्नः मी फिर्याद देतेवेळेस फिर्यादीमध्ये नमुद केलेले ओळखीचे व नात्यातील साक्षीदारांव्यतिरिक्त इतर कोणताही साक्षीदार तुम्ही दिलेला नाही याबद्दल तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तरः घटना घडली त्यावेळी नमुद साक्षीदार हेच त्याठिकाणी हजर होते.

हे खरे आहे की, अंजुबाई यादव शेळके या घटना ठिकाणापासुन ५०० फुट अंतरावर राहतात. आरोपी क्र. ३ वसंत हा देखील घटना ठिकाणापासुन २ किमी. अंतरावर राहतो. हे खरे आहे की, आरोपी क्र. ४ विजय व आरोपी क्र. ६ सुहास हे देखील घटना ठिकाणपासुन २ ते ४ किमी. अंतरावर राहतात. हे खरे आहे की, सर्व आरोपी हे दररोज कामानिमित्त बाहेरगावी असतात. साक्षीदार सांगते की, आरोपी हे दररोजच कामाला जातात असे नाही तर कधी सुट्टी असते तर सुट्टी घेऊन घरी असतात. हे खरे आहे की, मला आरोपींना सुट्टी कधी असते हे वैयक्तिकरित्या माहिती नाही.

०७. हे खरे नाही की, आरोपी क्र. १ व २ यांनी केसाला धरुन खाली आपटले व लाथाबुक्कयांनी मारहाण केली हे मी खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, सर्व आरोपींनी मला हातपाय तोडण्याची व जिवे मारण्याची धमकी दिली हे मी खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, दिनांक २७/०४/२०१५ रोजी सायंकाळी ६.०० वा. घटना घडली हे देखील खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, मी पोलीस स्टेशनला गेले, पोलिसांनी मला यादी दिली व डॉक्टरांकडे पाठविली हे मी खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, प्रस्तुतची केस दाखल करणेपुर्वी आरोपींसोबत जागेवरुन माझी किरकोळ बाचाबाची सुरु होती. जागेवरुन आरोपी व माझ्या वडिलांमध्ये देखील कोणतीही बाचाबाची सुरु नव्हती. हे खरे नाही की, आरोपींनी मला व माझ्या वडिलांना नेमक्या कोणत्या शिव्या दिल्या होत्या त्याचा उल्लेख माझ्या फिर्यादमध्ये नाही. हे खरे आहे की, माझ्या पतीचे गाव दापोडी नाही. हे खरे नाही की, मी अतिक्रमण करतेवेळी आरोपींनी मला कोणत्याही प्रकारे अटकाव करु नये म्हणुन जाणिवपुर्वक सदरची खोटी केस आरोपींविरुध्द दाखल केलेली आहे व आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास नाकारला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–
**(एस. डी. कुरणे)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, दौंड, पुणे.

ठिकाण : दौंड
दिनांक :१८.०७.२०१८.

सी.एन.आर.क्र. एम.एच.पी.यु.१८–०००८६२–२०१५
स. फौ. ख. क्र. २२९/२०१५
निशाणी क्र. ३८

**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र. २ :**
कारणे सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,
नांव :– सुभाष रघुनाथ खोडवे, वय :– ६० वर्षे,
धंदा :– शेती, राहणार :– दापोडी, ता. दौंड, जि. पुणे.

**सरतपास फिर्यादीतर्फे वकील श्री. एच. डी. भोईटे यांच्यामार्फत सुरु :–**

०१. फिर्यादी ही माझी मुलगी आहे. घटना दिनांक २७/०४/२०१५ रोजी सायंकाळी ६.०० च्या सुमारास फिर्यादीच्या राहत्या घरासमोर मौजे दापोडी, ता. दौंड, जि. पुणे येथे घडली. सदर दिवशी आरोपी क्र. ३ ते ६ यांनी माझ्या मुलीच्या डोक्याचे केस धरुन तिला लाथाबुक्क्यांनी आणि आरोपी क्र. ४ ते ६ यांनी कुदळीच्या दांड्याने मारहाण केली. साक्षीदार पुन्हा सांगतात की, आरोपी क्र. ३ ते ६ यांनी मारहाण केली. घराच्या जागेच्या रस्त्यावरुन भांडण झाले. त्याबाबत मी दिनांक २६/०४/२०१५ व दिनांक २७/०४/२०१५ रोजी पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. ज्यावेळेस आरोपीने फिर्यादीला मारहाण केली त्यावेळेस मी गावातच होतो. आरडाओरडा ऐकु आल्यानंतर मी तेथे गेलो. मी भांडण सोडविण्याचा प्रयत्न केला. तसेच चतुराबाई खंडु खोडवे, मोहन शंकर गुळमे, शिवाजी विनायक मोटे, खंडु सुभाष खोडवे, बबन भाऊ खोडवे यांनी सदर भांडण सोडविले. दिनांक २७/०४/२०१५ रोजी मी यवत पोलीस स्टेशनला फिर्याद दिली. आरोपींनी मला जिवे मारण्याची धमकी दिली व म्हणाले 'तुमचे हातपाय तोडु'. भांडण झाल्यानंतर मी पोलीस स्टेशनला गेलो होतो. यवत पोलीस स्टेशनच्या मदतीने आम्ही सरकारी दवाखान्यात गेलो. दिनांक २७/०४/२०१५ रोजी पोलिसांनी त्यांच्याविरुध्द एनसी केस नं. ६०९ अन्वये गुन्हा दाखल केला. आरोपी म्हणाले की, तुम्ही या गावात राहु नका हे गाव सोडुन जावा. आरोपीपासुन फिर्यादीच्या जिवास धोका आहे. साक्षीदार पुन्हा सांगतात की, आरोपी क्र. ३ ते ६ नसुन आरोपी क्र. ३ ते ८ असे आहेत.

सरतपास संपला.

**उलटतपास आरोपींतर्फे वकील श्री. पी. डी. खंडागळे यांच्यामार्फत सुरु :–**

०२. घटनास्थळ ते पोलीस स्टेशन साधारण १० ते १२ किमीचे अंतर आहे. पोलीस स्टेशनला फिर्याद नोंदविण्याकरिता मी, माझा मुलगा व फिर्यादी असे मिळुन मोटार सायकलवरुन गेलो होतो. आम्ही चौघे दोन मोटार सायकलवरुन पोलीस स्टेशनला गेलो होतो. मला दोन्ही मोटार सायकलचा क्रमांक सांगता येणार नाही. आम्ही संध्याकाळी ६.०० ते ६.१५ च्या सुमारास पोलीस स्टेशनला निघालो होतो व संध्याकाही ६.४५ च्या सुमारास पोलीस स्टेशनला पोहोचलो. हे खरे आहे की, आम्हाला ग्रामपंचायतीकडुन अतिक्रमण करुन बांधु नये याबाबत नोटीस आली होती. पोलिसांनी आमच्या तक्रारीची दखल घेतली नाही म्हणुन मी त्यांच्या वरिष्ठांकडे अर्ज केला होता व तो अर्ज या कामात दाखल केली आहे. मी वैद्यकीय प्रमाणपत्र या कामी

दाखल केली आहे. हे खरे आहे की, या कामातील साक्षीदार हे माझ्या जवळचे नातेवाईक आहेत. मी गेल्या ४० वर्षापासुन वस्तीपड येथे राहण्यास आहे. माझी मुलगी गावात राहते. महिला आरोपींनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व उर्वरित आरोपींनी टिकावच्या दांडक्याने मारहाण केली. पोलिसांनी ते दांडके जप्त केले नाही. आमच्या घरासमोर घटना घडली त्या घराचा मिळकत उतारा मी याकामी दाखल केला नाही. हे खरे आहे की, ज्या ठिकाणी घटना घटना घडली त्या ठिकाणी लोकवस्ती आहे. हे खरे नाही की, मी आरोपींच्या जागेत अतिक्रमण करतो व त्यामुळे मी आरोपींच्या विरुध्द खोटी केस दाखल केली आहे. हे खरे नाही की, फिर्यादी ही माझी मुलगी असल्यामुळे मी जाणिवपुर्वक आरोपींच्या विरुध्द खोटी साक्ष देत आहे. हे खरे नाही की, मी वस्तीवर राहत असल्यामुळे मी प्रत्यक्षपणे घटना पाहिली नाही व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/-

ठिकाण : दौंड
दिनांक : ०८.०१.२०१९.

**(श्रीमती एस. डी. अवसेकर)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, दौंड, पुणे.

# <u>शेरा</u>

मी शपथेवर सांगतो की या पी.डी.एफ न्यायनिर्णय फाईलमधील मजकुर हा मुळ न्यायनिर्णयातील मजकुराशी शब्द–न–शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | :: | अतनुरे एम. सी. |
| कोर्टाचे नांव | :: | श्रीमती एस. डी. अवसेकर<br>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, दौंड, जि.पुणे |
| दिनांक | :: | ०८/०१/२०१९ |
| पिठासीन अधिका–याने<br>निकालपत्रावर सही केलेचा दिनांक | :: | ०८/०१/२०१९ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | :: | ०८/०१/२०१९ |